


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३४६ वा शनिवार दि १८ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मोदी ३.0 सरकारला पहिला धक्का! महिला आरक्षण विधेयक नामंजूर; लोकसभेत प्रचंड गदारोळ...

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

मोदी सरकारसाठी महत्त्वाच्या असलेल्या महिला आरक्षण विधेयकावर लोकसभेत मतदान झालं आहे. लोकसभेच्या २९८ खासदारांनी विधेयकाच्या बाजूनं मतदान केलं. तर २३० खासदारांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. त्यामुळे हे विधेयक लोकसभेत नामंजूर झालं. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबद्दलची घोषणा केली. विधेयकावरील मतदानानंतर सदनात मोठा गोंधळ झाला. आम्ही महिलांच्या हक्कांसाठी लढा देत राहू, संघर्ष करत राहू, असं केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी जोरजोरात म्हटलं. तेव्हा विरोधकांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे वातावरण तापलं. यावेळी पंतप्रधान नरेंद्र लोकसभेत हजर होते. लोकसभेत विधेयक मंजूर करण्यात सरकारला अपयश आलं आहे. मोदी सरकार ३.0 साठी हा मोठा धक्का मानला जात आहे. महिलांना आरक्षण देणारं विधेयक सरकारकडून आज लोकसभेत मांडण्यात आलं. विधेयकाच्या मंजुरीसाठी दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा गरजेचा होता. पण तो मिळवण्यात सरकारला अपयश आलं. लोकसभेचं संख्याबळ ५४० इतकं आहे. विधेयकाच्या मंजुरीसाठी ३६० खासदारांचा पाठिंबा आवश्यक होता. पण या विधेयकाच्या बाजूनं केवळ २९८ खासदारांनी मतदान केलं. विधेयकाच्या मंजुरीसाठी ६२ मतं कमी पडली. एकूण २३० खासदारांनी विरोधात मतदान केलं. महिला आरक्षण विधेयक नामंजूर होताच सरकारनं या संदर्भातील आणखी २ विधेयकं मागे घेतली. त्यामुळे महिला आरक्षणाशी संबंधित तिन्ही विधेयकांच्या संदर्भात सरकारला धक्का बसला आहे. मतदान संपताच भाजप आणि एनडीएमधील पक्षांच्या महिला खासदारांनी विरोधकांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरु केली. संसदेच्या मकरद्वारावर खासदारांनी घोषणा दिल्या. यानंतर आता भाजप आणि एनडीएच्या पक्षांचे कार्यकर्ते उद्या म्हणजेच १८ एप्रिलला इंडिया ब्लॉकमधील पक्षांच्या नेत्यांच्या घरांबाहेर आंदोलनं करणार आहेत. महिला आरक्षण विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्यावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारला लक्ष्य केलं. संविधानावर आक्रमण करण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात आला. आम्ही ते आक्रमण परतवून लावलं. आम्ही त्यांचा पराभव केला. लोकसभेत विधेयक नामंजूर झाल्यानंतर तुम्ही पंतप्रधान मोदींचा चेहरा पाहिला का, असा सवाल त्यांनी विचारला.



# राहुल गांधींविरोधात एफआयआर नोंदवा! कोर्टाचे आदेश; मोदी-शहांनी दिलेल्या टॉप सीक्रेट फाईल्समुळे गोची?

**वृत्तसंस्था/ लखनऊ**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठानं एक महत्वाचा आदेश दिला आहे. रायबरेलीतील पोलीस ठाण्यात राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. हे प्रकरण राहुल गांधी यांच्या ब्रिटिश नागरिकत्वाशी संबंधित आहे. भाजप नेते विग्नेश शिशिर यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठात एक याचिका दाखल केली होती. राहुल गांधी यांच्याकडे ब्रिटनचं नागरिकत्व असल्याचा आरोप त्यांनी केला होता. राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी शिशिर यांच्याकडून करण्यात आली होती. त्यावर न्यायालयात सुनावणी झाली. राहुल गांधी यांच्याकडे दुहेरी नागरिकत्व असल्याचा आरोप आहे. म्हणजेच ते एकीकडे भारताचे नागरिक आहेत. सोबतच ते ब्रिटनचेही नागरिक आहेत. भारतीय कायद्यानुसार एका व्यक्तीकडे केवळ एकाच देशाचं नागरिकत्व असायला हवं. एखाद्या व्यक्तीकडे दुहेरी नागरिकत्व असल्यास तो भारतात निवडणूक लढवू शकत नाही आणि खासदारही होऊ शकत नाही. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी रायबरेलीमधून विजयी होऊन खासदार झाले. यानंतर विग्नेश शिशिर यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. राहुल गांधी यांच्याकडे ब्रिटनचं नागरिकत्व असल्यास त्यांची खासदारकीच बेकायदेशीर ठरते, असा दावा त्यांनी याचिकेतून केला न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या खंडपीठानं याचिकेवर सुनावणी घेतली. या प्रकरणात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. राहुल गांधी यांच्या विरोधात रायबरेली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, अशी मागणी उत्तर प्रदेश सरकारनं केली होती. ही मागणी न्यायालयानं मान्य केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांनी या प्रकरणाशी संबंधित टॉप सीक्रेट फाईल न्यायालयाला देण्याची परवानगी दिली. त्यामुळेच न्यायालयानं हा निकाल दिल्याचं भाजप नेते शिशिर म्हणाले.





# बुद्धिबळातील थोरली...



बुद्धिबळात जगज्जेता ठरवण्याची पद्धत थोडी वेगळी आहे. त्यात गतविजेता थेट जागतिक लढतीस पात्र ठरतो, तर ङ्गकँडिडेट्सफ स्पर्धेतील विजेता किंवा विजेती जागतिक विजेत्याचे आव्हानवीर होतात. या वेळची ङ्गकँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धाफ सुरू झाली त्या वेळी रमेशबाबू वैशाली हिला फारसे कोणी जमेस धरत नव्हते. ती आठ स्पर्धकांतील सर्वांत कमी मानांकन असलेली खेळाडू होती. भारतीयांच्या आशा टिकून होत्या त्या केवळ दिव्या देशमुखवर. कोनेरू हम्पीच्या माघारीची हळहळ होती. प्रत्यक्ष स्पर्धेत पहिल्या पाच फेऱ्यांत चार बरोबरी आणि एक पराभव या कामगिरीमुळे तर वैशाली फार काही करू शकणार नाही, अशी अटकळच बुद्धिबळप्रेमींनी बांधली होती. मात्र नंतर चित्र बदलत गेले आणि ती विजेती झाली. रमेशबाबू वैशाली म्हटल्यावर बहुतेक जण ङ्गहा... ती प्रज्ञानंदची थोरली बहीणफ अशी प्रतिक्रिया देतात. ती आता बुद्धिबळातही थोरली झाली आहे! खरे तर वैशालीचे कार्टून पाहण्याचे वेड कमी करण्यासाठी त्यांच्या आई-वडिलांनी तिला बुद्धिबळाच्या प्रशिक्षणाकडे वळवले. तिला खेळताना पाहून छोट्या प्रज्ञानंदनेही बुद्धिबळ खेळण्याचा आग्रह धरला. त्याची प्रगती वेगाने झाली. त्यात वैशालीचे यश झाकोळत होते. प्रत्यक्षात तिचे सुरुवातीचे प्रशिक्षक आर. बी. रमेश यांना वैशालीचा खेळ जास्त प्रभावित करीत होता. प्रज्ञानंदचा खेळ भक्कम, व्यावसायिक; तर वैशालीचा खेळ रसिकांना बुद्धिबळाचा आनंद देणारा. प्रतिस्पर्ध्याभोवती जाळे टाकत त्यानंतर त्याच्यावर आक्रमण करण्याचे वैशिष्ट्य आर. बी. रमेश आणि त्याची पत्नी, महिला ग्रँडमास्टर आरती रामस्वामी यांना प्रभावित करीत होते. सायप्रसमध्ये प्रज्ञानंदला सुरुवातीचा धडाका राखता आला नाही. मात्र, त्याने त्याचे शल्य बाजूला ठेवत वैशालीला साथ द्यायला सुरुवात केली. प्रज्ञानंदच्या आग्रहाखातर वैशाली ङ्गकँडिडेट्सफपूर्वीच्या स्विस लिग स्पर्धेत खेळली. त्यातील यशाने तिला विश्वास दिला. स्पर्धेच्या अखेरच्या टप्प्यात एका गुणाची आघाडी गमावल्यानंतरही ती अविचल राहिली. सुट्टीच्या दिवशी स्वतःला रिसेट केले. पुरेशी झोप आणि योग हे सूत्र पाळणारी वैशाली आव्हानास केवळ सामोरीच गेली नाही, तर तिने पारही केले. कँडिडेट्स स्पर्धा सुरू झाल्यापासून वैशालीच्या रूपाने प्रथमच भारतीय महिलेला हे यश मिळाले आहे. कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख यांच्याकडून अपेक्षित असलेले यश वैशालीने मिळवून दिले आहे. कुणी सांगावे, या वर्षाच्या अखेरीस पुरुष; तसेच महिलांमधील ६४ घरांचे जगज्जेते भारतीय असतील.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## महिला आरक्षणावरुन मोदींचा थेट इशारा..

# विरोध करणाऱ्यांना किंमत चुकवावी लागेल

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

महिला आरक्षणावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना धारेवर धरले आहे. महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना याची किंमत प्रदीर्घकाळ चुकवावी लागेल. आपल्या देशात जेव्हा जेव्हा निवडणुका आल्या आहेत, तेव्हा ज्या कोणी महिलांच्या या हक्काला विरोध केला आहे, त्यांना जबरदस्त धक्का बसला आहे. त्यांना कधीही माफी मिळाली नाही, असेही मोदी यांनी गुरुवारी लोकसभेत सुनावले.

'कोणत्याही देशाच्या आयुष्यात असे काही निर्णायक क्षण येतात. त्यावेळी समाजाची मानसिकता आणि नेतृत्त्वाकडे असलेली त्या संधीचं सोनं करण्याची क्षमता देशाचं भविष्य बदलते. एका सशक्त देशाची निर्मिती करते. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात हा क्षण तसाच आहे. भारत लोकशाहीची जन्मभूमि आहे. विकासाच्या यात्रेला एक नवा आयाम देण्याची पवित्र संधी आपल्याला मिळाली आहे. देशाच्या निम्म्या लोकसंख्येला राष्ट्र निर्माणाच्या निर्णय



प्रक्रियेत सहभागी करण्याची संधी आपल्याला मिळाली, हे आपले भाग्य आहे,' असे मोदी म्हणाले.

कोणत्याही राज्याचं महत्त्व कमी होणार नाही, याची ग्वाही मोदींनी लोकसभेत दिली. 'लोकसभेतील कोणत्याही राज्याचं महत्त्व घटणार नाही. काही जण केवळ राजकीय स्वार्थासाठी वादळ निर्माण करत आहेत,' अशा शब्दांत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा दिला. 'जर गॅरेंटी शब्द हवा असेल तर मी त्या शब्दाचा वापर करतो. जर तुम्हाला आश्वासन शब्द हवा असेल तर मग ती त्याचा वापर करतो. तमिळमध्ये कोणता अधिक चांगला शब्द असेल तर तो बोलायलाही मी तयार आहे. कारण नियत साफ असेल तर शब्दछल करण्याची गरज भासत नाही,' असं म्हणत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

### राजकीय फायद्यासाठी महिला आरक्षण विधेयक : प्रियांका गांधी..



लोकसभेत महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर झालेल्या चर्चेदरम्यान काँग्रेस खासदार प्रियंका गांधी-वाड्रा यांनी केंद्र सरकार आणि भाजपवर जोरदार टीका केली. पंतप्रधानांच्या वक्तव्यांवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी अर्धसत्य मांडले जात असून, महिला आरक्षण विधेयकाचा राजकीय फायदा करून घेतला जातोय, असा आरोप केला. चर्चेदरम्यान प्रियंका गांधी म्हणाल्या की, आमचा काँग्रेस पक्ष महिलांच्या संरक्षण आणि आरक्षणाच्या बाजूने ठामपणे उभी आहे आणि पुढेही राहील. २०२३ मध्ये मंजूर झालेल्या विधेयकात हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते की, महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीपूर्वी जनगणना आणि सीमांकन केले जाईल. प्रतिनिधित्वाचा मुद्दा हा लोकसंख्येच्या मुद्द्याशी अविभाज्यपणे जोडलेला आहे. जोपर्यंत जात-आधारित जनगणना केली जात नाही, तोपर्यंत समाजातील सर्व घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळू शकत नाही,असे त्या म्हणाल्या.

## 'पंजाब पोलिसांनी हटविली खा.राघव चड्ढांची झेडप्लस सुरक्षा

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

आम आदमी पक्षाचे नेते आणि राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांना पंजाब पोलिसांकडून देण्यात आलेली झेड प्लस श्रेणीची सुरक्षा हटविण्यात आली आहे. आम आदमी पक्षासोबतचे चड्ढा यांचे मतभेद वाढत असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे. तर राघव चड्ढा यांना केंद्र सरकारकडून सुरक्षा पुरविण्यात आली आहे. जोपर्यंत औपचारिक केंद्रीय सुरक्षा व्यवस्था होत नाही तोवर त्यांना सुरक्षा पुरविण्याचा निर्देश सध्या दिल्ली पोलीस विभागाला देण्यात आला आहे.

आम आदमी पक्षाने अलिकडेच चड्ढा यांना राज्यसभेतील स्वत:च्या उपनेतेपदावरून हटविले होते. यावर चड्ढा यांनीही मला गप्प करण्यात आले असले तरीही पराभूत केले नसल्याची मार्मिक टिप्पणी केली होती. संसदेत पंजाबचे मुद्दे उपस्थित न करणे आणि केंद्र सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका न अवलंबिण्याचा आरोप राघव यांच्यावर पक्षाकडून करण्यात आला आहे.

आक्रमक भूमिका घेत राघव चड्ढा यांनी



पक्षाचे आरोप खोटे असल्याचे फेटाळले . संसदेत माझी भूमिका सार्वजनिक मुद्दे उपस्थित करण्याची आहे, अडथळे निर्माण करण्याची नाही. विरोधी पक्षांच्या प्रमुख कार्यवाहीपासून मी अंग काढून घेतले नव्हते असा दावा चड्ढा यांनी केला आहे. उपनेतेपदावरून हटविण्यात आल्यावर राघव यांनी अनेक व्हिडिओ अन् वक्तव्यं शेअर केली आहेत. यातून त्यांनी गप्प न बसण्याचे आणि पक्षाच्या टीकेवर सातत्याने प्रत्युत्तर देत राहण्याचे संकेत दिले आहेत. राघव यांनी एका पुस्तकाच्या अध्यायाचे चित्रही शेअर केले असून याचे शीर्षक 'नेव्हर आउटशाइन द मास्टर' असे हेते. याला व्यापक स्वरुपात पक्ष प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्यावरील टिप्पणी म्हणून पाहिले गेले.

## १ लाख ७५ हजार कोटींची गुंतवणूक

■ मुंबई/वृत्तसंस्था

उद्योगस्नेही वातावरणामुळे राज्यात उद्योगांचे नवे पर्व सुरु झाले असून श्याम स्टील आणि जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूहाने एक लाख ७५ हजार कोटींची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यातून हजारो रोजगार निर्माण होणार असून गुंतवणुकीसाठी येत असलेल्या उद्योग समूहांना सरकार सर्व सहकार्य करीत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुंतवणूकदारांनी राज्यात यावे, असे आवाहन केले.

श्याम स्टील आणि जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूहाने राज्यात गुंतवणुकीसाठी वर्षा निवासस्थानी आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्याच्या उद्योग विभागासोबत सामंजस्य करार केले. उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी अन्बलगण, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, श्याम स्टील उद्योग समूहाचे अध्यक्ष पुरुषोत्तम बेरीवाला, व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ बेरिवाला, जेडब्ल्यू उद्योग समूहाचे अध्यक्ष जयदीप वानखेडे, व्यवस्थापकीय संचालक ख्रिस्ती रेनेहान, संचालक संजय वाजे आदी उपस्थित होते. राज्यात गुंतवणूक येऊन त्याचे उद्योगात रूपांतर करण्यासाठी अनेक धोरणात्मक सुधारणा करण्यात आल्या आहेत. उद्योग उभारण्यासाठी गुंतवणूकदारांना सरकार पुरेपूर सहकार्य करीत आहे. त्यामुळे राज्यामध्ये सद्यस्थितीत उद्योगांचे नवे पर्व सुरू झाले असून श्याम स्टील आणि जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूह राज्यात करीत असलेली गुंतवणूक त्याचे मूर्तीमंत उदाहरण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. राज्यात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दाखविलेल्या उद्योग समूहांना प्रत्यक्षपणे उद्योग सुरू करण्यास सुटसुटीत प्रक्रिया करण्यात आली आहे. शाश्वत ऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये जेडब्ल्यू ग्लोबल च्या माध्यमातून



गुंतवणूक येत आहे. केंद्र सरकारने सिव्हिल न्यूक्लिअर एनर्जी क्षेत्रामध्ये गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. त्यानुसार राज्याने स्मॉल मॉड्युलर न्यूक्लिअर रिॲक्टर मध्ये गुंतवणूक करण्यास देशात पुढाकार घेतला असून यासाठी दोन सामंजस्य कराराही करण्यात आले आहेत. राज्याच्या कुठल्याही भागामध्ये गुंतवणूक करण्यास स्वारस्य दाखवल्यास सरकार सबंधित उद्योग समूहाला पुरेपूर सहकार्य करेल अशी ग्वाहीही फडणवीस यांनी दिली. जेडब्ल्यू ग्लोबल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी राज्यात जवळपास एक लाख ६५ हजार कोटींची गुंतवणूक करीत आहे. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात फ्लोटिंग सोलर पावर अँड एनर्जी स्टोरेज च्या माध्यमातून कंपनी १४ हजार ९७६ कोटींची गुंतवणूक करीत असून त्यामुळे कायमस्वरूपी ५०० रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता कॅम्पस आणि डाटा सेंटर, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प, स्मॉल मॉड्युलर न्यूक्लिअर रिऍक्टर या क्षेत्रात जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूह गुंतवणूक करीत आहे. या संपूर्ण गुंतवणुकीमुळे राज्यात जवळपास ३ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. तसेच पश्चिम बंगालमधील श्याम स्टील उद्योग समूह चंद्रपूर जिल्ह्यात गोडपिंपरी तालुक्यामध्ये दहा हजार कोटीची गुंतवणूक करून स्टील उद्योग उभारत आहे.

## परिसीमन विधेयकाला विरोध करणार; विरोधकांच्या बैठकीत निर्णय

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

केंद्र सरकारने महिला आरक्षण कायद्यात परिवर्तन करण्यासाठी आयोजित केलेल्या वाढीव अर्थसंकल्पीय संसद अधिवेशनाचा प्रारंभ आज गुरुवारपासून होत आहे. या अधिवेशनात केंद्र सरकार तीन विधेयके सादर करणार आहे. लोकसभेची सदस्य संख्या वाढविण्यासंबंधीचे विधेयक सर्वात महत्वाचे आहे. मात्र, विरोधी पक्षांच्या 'इंडी' आघाडीने या विधेयकांना विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे.

विरोधी आघाडीच्या या निर्णयामुळे संसदेत स्वारस्यपूर्ण परिस्थिती पहावयास मिळणार आहे. ही विधेयके संमत करण्यासाठी दोन तृतियांश बहुमताची आवश्यकता लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये आहे. सध्या केंद्र सरकारजवळ दोन्ही सभागृहात



असे बहुमत नाही. लोकसभेत सरकारला दोन तृतीयांश बहुमतासाठी किमान 71 अतिरिक्त खासदारांची आवश्यकता लागणार आहे. तर राज्यसभेत 23 अतिरिक्त खासदारांच्या समर्थनाची आवश्यकत आहे.

लोकसभेत सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे 294 खासदारांचे बळ आहे. दोन तृतीयांश बहुमतासाठी आणखी 71 खासदारांची आवश्यकता आहे. विरोधी 'इंडी' आघाडीकडे सध्या लोकसभेत 232 खासदार आहेत. तर 17 खासदार अपक्ष किंवा अन्य पक्षांचे आहेत. या 17 खासदारांनी विधेयकांना पाठिंबा दिला, तरी सरकारला 52 खासदारांची आवश्यकता आहे. राज्यसभेत सरकारला 23 खासदारांची आवश्यकता आहे. राज्यसभेत सरकारसाठी स्थिती थोडी सुकर आहे.

घटनेतील नियमानुसार घटना परिवर्तन करायचे असल्यास सभागृहाच्या एकंदर संख्याबळापैकी किमान 50 टक्के, तर सभागृहात मतदानात भाग घेणाऱ्या सदस्यांपैकी किमान दोन तृतीयांश सदस्यांचे समर्थन आवश्यक आहे. हाच नियम राज्यसभेलाही लागू आहे. दोन्ही सभागृहांमध्ये सरकारजवळ प्रत्येक सभागृहाच्या संख्याबळाच्या 50 टक्क्यांहून अधिक जागा आहेत. त्यामुळे प्रथम अट सरकार पार करु शकते.

पण दोन तृतीयांश बहुमताची अट पूर्ण करण्यासाठी विरोधी पक्षांच्या काही खासदारांचा पाठिंबा आवश्यक आहे, अशी स्थिती सध्या दिसून येत आहे. विरोधी पक्षांनी मतदानाच्या वेळी सभात्याग केल्यास किंवा काही विरोधी पक्षांचे खासदार अनुपस्थित राहिल्यास सरकारसाठी स्थिती अनुकूल होऊ शकते. आतापर्यंत या मार्गाने केंद्र सरकारने अनेक विधेयके संमत करुन घेतली आहेत. तेव्हा, या तीन विधेयकांसंबंधी काय घडते याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## अतिगर्दी आणि खराब हवामानामुळे बोट बुडाली; फक्त ९ जणांची सुटका

# अंदमान समुद्रात बोट दुर्घटना; 250 हून अधिक बेपत्ता



### नऊ जणांना वाचवण्यात यश

बांगलादेश तटरक्षक दलाने (बीसीजी) 9 एप्रिल रोजी इंडोनेशियाला जाणाऱ्या आपल्या एका जहाजाने समुद्रातून एका महिलेसह नऊ जणांची सुटका केल्याची माहिती दिली. बांगलादेशी ध्वज असलेल्या 'एमटी मेघना प्राईड' या जहाजाने अंदमान बेटांजवळ खोल पाण्यात काही लोकांना तरंगताना पाहिले. त्यानंतर त्यांची सुटका केली. वाचलेल्यांना नंतर बांगलादेश तटरक्षक दलाच्या 'मन्सूर अली' या गस्ती जहाजाच्या ताब्यात देण्यात आल्याचे बीसीजीचे प्रवक्ते लेफ्टनंट कमांडर सब्बीर आलम सुजान यांनी सांगितले.

**अंदमान, वृत्तसंस्था :**

अंदमान समुद्रात एक बोट उलटल्याने सुमारे 250 रोहिंग्या आणि बांगलादेशी नागरिक बेपत्ता झाले आहेत. संयुक्त राष्ट्र निर्वासित आणि स्थलांतरण संस्थेनुसार, हा अपघात गेल्या आठवड्यात खराब हवामान आणि क्षमतेपेक्षा जास्त भारामुळे झाला. ही बोट बांगलादेशहून मलेशियाला जात होती. बांगलादेश तटरक्षक दलाने आपल्या एका जहाजाच्या मदतीने नऊ जणांची सुटका केली, परंतु उर्वरित प्रवाशांचा अद्याप शोध लागलेला नाही.

2017 मध्ये म्यानमारमधील हिंसाचारानंतर रोहिंग्या समुदायाला मोठ्या संख्येने बांगलादेशात आश्रय घेण्यास भाग पडले. म्यानमार सरकार त्यांना नागरिकत्व देत नाही. दरम्यान, बांगलादेशातील निर्वासित छावण्यांमधील वाईट परिस्थितीमुळे अनेकजण मलेशियासारख्या देशांमध्ये चांगल्या जीवनाच्या शोधात धोकादायक सागरी प्रवास करतात. अशा प्रवासादरम्यानच दक्षिण बांगलादेशातील टेकनाफ येथून मलेशियासाठी निघालेली एक बोट बुडाली आहे. जोरदार वारे, खवळलेला समुद्र आणि अतिगर्दीमुळे बोट बुडाली. प्राथमिक माहितीनुसार, बोटीत अंदाजे 280 लोक होते. सदर बोट 4 एप्रिल रोजी बांगलादेशातून निघाली होती.

**बेपत्ता झालेल्यांमध्ये मोठ्या संख्येने रोहिंगे**

या अपघातात बेपत्ता झालेल्यांमध्ये अनेक मुलांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बोटीत मोठ्या संख्येने रोहिंग्याही होते. बोटीतील रोहिंग्या निर्वासित बांगलादेशातील कॉक्स बाजार येथील विस्तीर्ण छावण्यांमधून पळून जाण्याचा प्रयत्न करत होते. याठिकाणी म्यानमारच्या रखाइन राज्यातून विस्थापित झालेले दहा लाखांहून अधिक निर्वासित अत्यंत दयनीय परिस्थितीत राहत आहेत.

## टीसीएस छळ प्रकरण : शफी शेख, रझा मेमनला पोलीस कोठडी



**नाशिक/वृत्तसंस्था**

टीसीएस बहुराष्ट्रीय कंपनीतील विनयभंग, अश्लील टिप्पणी प्रकरणी दाखल गुन्ह्यात संशयित शफी शेख आणि रझा मेमन यांना न्यायालयाने १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. संशयितांवर याच प्रकरणात आणखी काही गुन्हे दाखल आहेत.

प्रसिध्द अशा टीसीएस कंपनीत मागील चार वर्षांत महिलांवर अन्याय, अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न, मांसाहार करायला भाग पाडणे, विशिष्ट प्रार्थना व उपवास करायला लावणे आदी प्रकार घडल्याचे उघड झाले. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध नऊ स्वतंत्र गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणात दानिश शेख (३१) तौफिख अत्तार (३४), शाहरूख हुसैन कुरैशी (३४) रझा मेमन (३५), असिफ अन्सारी, शफी शेख आणि अश्विनी चैनानी (५१, लुलानगर, पुणे) यांना अटक झाली आहे. सध्या हे संशयित न्यायालयीन कोठडीत आहेत. यातील संशयित निदा खान मात्र अजूनही पोलिसांच्या हाती लागलेली नाही. कारागृहात असणाऱ्या शफी शेख आणि रझा मेमन या दोघांना पीडितेशी शारीरिक जवळीक निर्माण करण्याच्या गुन्ह्यात अटक झाली आहे. संशयितांनी पीडितेच्या खासगी आयुष्याबाबत वारंवार चर्चा केली.

शफीने प्रेमाचा प्रस्ताव ठेवला. तर रजा मेमनने तक्रारदाराच्या शरीरावर अश्लील टिप्पणी केली. हे दोघे संशयित पीडितेशी अंगलट करायचे, असे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणात दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी बचाव पक्षाच्या वकिलांनी एकाच वेळी गुन्हे घडले असताना गुन्हे नोंदवहीत सर्व गुन्ह्यांचा तपास पोलिसांनी करायला पाहिजे, असा मुद्दा मांडला. त्यावर सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता किरण बेंढभर यांनी प्रतिवाद केला. संशयितांची गुन्हा पद्धत जरी एकसारखी असली तरी पीडिता या वेगवेगळ्या आहेत. गुन्ह्याचा कालावधी आणि हकीकत वेगवेगळी आहे. तसेच संशयित रजाविरुद्ध तीन आणि शफीविरुद्ध चार गुन्हे दाखल आहेत. संशयिताचा भ्रमणध्वनी जप्त झाल्यानंतर आणखी काही गुन्हे अथवा इतर संशयितांचा सहभाग निष्पन्न होऊ शकतो. त्यामुळे त्यांना सहानुभूती न दाखवता पोलीस कोठडी देण्याची मागणी बेंढभर यांनी केली. न्यायालयाने दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून संशयितांना १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. शहरातील टीसीएस बहुराष्ट्रीय कंपनीत मागील चार वर्षांत महिलांवर अन्याय, अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न, मांसाहार करायला भाग पाडणे, विशिष्ट प्रार्थना व उपवास करायला लावणे आदी प्रकार घडले. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध एकूण नऊ गुन्हे दाखल आहेत.

## अमरावती लैंगिक शोषण प्रकरणात ४ जणांना बेड्या

### • व्हिडिओ व्हायरल करणारे 'रडार'वर

**अमरावती/वृत्तसंस्था**

परतवाडा येथील लैंगिक शोषण आणि आक्षेपार्ह चित्रफिती समाज माध्यमांवर प्रसारित केल्याप्रकरणी पोलिसांनी आणखी चार आरोपींना अटक केली आहे. आतापर्यंत या प्रकरणात अटक झालेल्यांची संख्या आठवर पोहचली आहे. या प्रकरणी अद्याप पीडित मुली किंवा त्यांचे पालक तक्रारीसाठी अद्यापही समोर आलेले नाहीत, अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

संपूर्ण राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणात पहिली अटक ही १९ वर्षीय मुख्य आरोपी अयान अहमद याची झाली होती. त्यानंतर अश्लील चित्रफिती आणि छायाचित्रे समाज माध्यमांवर प्रसारित करणाऱ्या आणखी तीन आरोपींना काल पोलिसांनी अटक केली. तर हेच साहित्य एकमेकांना पुरविणाऱ्या आणखी चार जणांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्यात येथील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कठोरा मार्गावरील एका सदनिकेत भाड्याने राहणाऱ्या एका युवकाचाही समावेश आहे. त्याने ही सदनिका आरोपी अयान अहमद याला उपलब्ध करून दिली होती. पोलिसांनी या घटनास्थळाचा पंचनामा पूर्ण केला आहे. घरझडतीही घेण्यात आली आहे.

चौकशीदरम्यान आरोपी अयानने पीडित मुलींचे लैंगिक शोषण त्याच्या मित्राच्या सदनिकेवर केल्याची कबुली दिली होती. ही सदनिका पुरवणारा




मित्र मानव दीपक सुगंधे (२०, रा. आर्वी, ह.मु. अमरावती) पोलिसांनी अटक केली आहे. तसेच इतर आरोपींकडून आक्षेपार्ह चित्रफिती प्राप्त करून त्या समाज माध्यमांवर प्रसारित करणारे आरोपी ऐफाज खान मंजूर खान (२६), मोहम्मद इम्रान मोहम्मद साजिद (२१) आणि शेख नावेद शेख हसन (२१, तिघेही रा. अचलपूर) यांना देखील अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात तांत्रिक तपासाच्या आधारे अश्लील छायाचित्रे आणि चित्रफिती एकमेकांकडे प्रसारित करणाऱ्यापैकी ऐफाज या आरोपीच्या घरझडतीतून लॅपटॉप, टॅब आणि हार्डडिस्क जप्त करण्यात आले आहेत आणि त्याची फॉरेन्सिक तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली.

## ४.५ लाखांच्या मागणीसाठी सासरच्यांकडून शारीरिक जाच

**मंगळवेढा/वृत्तसंस्था**

निंबोणी येथील एका २५ वर्षीय विवाहितेस मोटारसायकलला व घराचे डिपॉझिट करिता चार लाख ५० हजार रुपये माहेरहून घेऊन ये, तसेच तू मुलीला जन्म दिला, आम्हाला मुलगा पाहिजे या कारणावरुन तिचा शारीरिक, मानसिक छळ केल्याप्रकरणी पती निवांत बाळू नरळे, सासू जनाबाई बाळू नरळे, सासरे बाळू श्रीमंत नरळे (रा. बावची) या तिघांविरुध्द मंगळवेढा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

यातील विवाहित महिला तथा फिर्यादी गौरी निवांत नरळे (वय २५, रा. निंबोणी) हिचा विवाह २८नोव्हेंबर रोजी बावची येथील निवांत बाळू नरळे यांच्यासोबत कल्याणमध्ये हिंदू रितीरिवाजाप्रमाणे झाला होता. लग्नाच्यावेळी फिर्यादीच्या वडिलाने अडीच तोळ्याचे सोन्याचे दागिने केले होते. लग्नानंतर आरोपी पतीने तीन महिने कल्याण येथे व्यवस्थित नांदवले. तद्नंतर नवऱ्याने व त्याच्या आई-वडिलाने बावची येथे सासरी पाठवले. पती हा काही दिवस येत जात होता. तद्नंतर तुझ्या वडिलाकडून मोटारसायकलसाठी व कल्याण येथे घराच्या डिपॉझिटसाठी असे एकूण चार लाख ५० हजारांची मागणी केली. यावेळी फिर्यादीने माझे बडीलचालक व्यावसायिक असून एवढी मोठी रक्कम देणे शक्य नाही, असे फिर्यादी म्हणाल्यावर वारंवार पैशासाठी तगादा लावून शिवीगाळी, दमदाटी व हाताने मारहाण करू लागले. समाजातील काही प्रतिष्ठित लोकांनी सासरकडील मंडळींना समजावून सांगितले होते. त्यामुळे काही दिवस घरातील नवरा, सासू, सासरे शांत राहिले. २०२३ मध्ये फिर्यादीस मुलगी झाली, त्यामुळे आरोपीने चिडून आम्हाला मुलगा पाहिजे होता. तू मुलीला जन्म का दिला आहे, तू व तुझी मुलगी पांढऱ्या पायाची आहे असे म्हणून वारंवार भांडणतंटा करु लागले. तद्नंतर त्याने फिर्यादीस उपाशी ठेवून घरातून हाकलून दिले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# मुंबई इंडियन्सने पंजाबसमोर गुडघे टेकले

## हार्दिक पंड्याच्या संघाचा सलग चौथा पराभव, श्रेयस अय्यर ठरला हिरो

**मुंबई, वृत्तसंस्था :**

मुंबई इंडियन्सला स्पर्धेतील सलग चौथा सामना गमावावा लागला आहे. पंजाब किंग्सने मुंबईचा त्यांच्या घरच्याच मैदानावर ७ विकेट्सने आणि २१ चेंडू शिल्लक ठेवत एकतर्फी पराभव केला आहे. मुंबई इंडियन्सचे गोलंदाज सातत्याने अपयशी पडत असल्याने संघाला याचा फटका बसत आहे. तर पंजाब किंग्सने पुन्हा एकदा सांघिक कामगिरीच्या बळावर आपली विजयी घौडदौड कायम ठेवली आहे.

मुंबई इंडियन्सने दिलेल्या १९६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना १६.३ षटकांत एकतर्फी सामना जिंकला. प्रियांश आर्या १५ धावा करत झेलबाद झाला. प्रभसिमरन सिंगने ३९ चेंडूत ११ चौकार व २ षटकारांसह ८० धावांची वादळी खेळी केली. याशिवाय कर्णधार श्रेयस अय्यरने ३५ चेंडूत ५ चौकार व ४ षटकारंसह ६६ धावांची खेळी केली. श्रेयस अय्यरने फिल्डिंगमध्ये हार्दिक पंड्याला झेलबाद करण्यासाठी बार्टलेटच्या जोडीने कमालीचा रिले कॅच पकडला. श्रेयस अय्यरशिवाय कुपर कॉनोलीने १७ धावांचं







आणि मार्कस स्टॉयनिसने १० धावांचं योगदान दिलं. श्रेयस अय्यर आणि प्रभसिमरन सिंग यांनी १३९ धावांची मॅचविनिंग भागीदारी रचली आणि मुंबईने तिथेच सामना गमावला. मुंबईकडून अल्लाह गझनफरने २ विकेट्स आणि शार्दुल ठाकूरने १ विकेट घेतली. पंजाबने नाणेफेक जिंकत मुंबईला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. मुंबईची सुरूवात पुन्हा एकदा खराब झाली. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत क्विंटन डीकॉकला संधी मिळाली. रायन रिकल्टन व डीकॉकची जोडी सलामीला उतरली. रिकल्टन २ धावा तर पुढच्याच चेंडूवर सूर्या गोल्डन डकवर बाद झाला. यानंतर क्विंटन डी कॉक व नमन धीर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ६८ चेंडूत १२२ धावांची भागीदारी रचली. नमन धीर ३१ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह अर्धशतक करत बाद झाला.

मुंबईकडून रोहितच्या अनुपस्थितीमुळे क्विंटनला खेळण्याची संधी मिळाली आणि त्याने पहिल्याच सामन्यात शतक झळकावलं आहे. क्विंटनने या सामन्यात ६० चेंडूत ८ चौकार व ७ षटकारांसह ११२ धावांची खेळी केली. हार्दिक पंड्याने १४ धावांचं तर तिलक वर्माने ८ धावांचं योगदान दिलं. यासह मुंबईने प्रथम फलंदाजी करताान २० षटकांत ६ बाद १९५ धावांची खेळी केली. पंजाबकडून अर्शदीपने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या, तर मार्को यान्सन व शशांक सिंग यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

# रमेशबाबू वैशालीचा ऐतिहासिक विजय; 'कँडिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धेत तिरंगा फडकावला

**माद्रिद/वृत्तसंस्था**

भारताच्या २५ वर्षीय रमेशबाबू वैशालीने ‘कँडिडेट्स’ बुद्धिबळ स्पर्धा जिंकत नवा इतिहास घडवला. ही स्पर्धा जिंकून जगज्जेत्या जू वेन्जूनची आव्हानवीर बनणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. परंतु कायम डोके शांत ठेवून आणि आणीबाणीच्या काळात डगमगून न जाता वैशालीने हे यश मिळवले आहे.

आठ खेळाडूंमध्ये सर्वांत कमी रेटिंगची खेळाडू वैशाली होती आणि तिला कोणी खिजगणतीतही धरत नव्हते. माजी जगज्जेती टॅन झोंगयी आणि अग्रमानांकित झू जिनेर या चिनी खेळाडूंचा दबदबा होताच! विश्वचषक विजेती दिव्या देशमुख आणि माजी ‘कँडिडेट्स’ विजेती ॲलेक्सांड्रा गोर्याचकिना यांनाही जाणकार कौल देत होते.

ससा-कासवाच्या शर्यतीची जी कथा आहे, तसेच काहीसे सायप्रसच्या निसर्गरम्य बेटावर घडले. वैशालीची सुरुवात अतिशय धीमी होती. पहिले चार डाव बरोबरीत सुटल्यावर पाचवा डाव ती झू जिनेरविरुद्ध हरली, त्या वेळी ती



सर्वांत तळाला होती. पण वैशालीच्या खेळाचा इतिहास पाहता आणि विशेषत: तिची २०२४ मधील कामगिरी बघता ती आता चमत्कार घडवणार अशी तिच्या चाहत्यांना अपेक्षा होती. त्या प्रमाणे तिने पुढील चारपैकी तीन डाव जिंकून आघाडी घेतली. तिच्या प्रतिस्पर्धी गडबडून गेल्यासारख्या तिच्याविरुद्ध खेळत होत्या. गेल्या अर्थात कॅनडा येथे झालेल्या २०२४ सालच्या कँडिडेट्समध्येही वैशालीने अशीच काही करामत केली होती.

त्या वेळी पहिल्या नऊ फेऱ्यांमध्ये विजयाच्या दुष्काळात राहणाऱ्या झुंजार वैशालीने त्यानंतर विजयांचा धडाका लावून अखेरच्या पाच डावांत आपल्या प्रतिस्पध्र्यांना नामोहरम केले आणि चक्क दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली होती. सायप्रसमध्ये वैशाली प्रगल्भ झाल्याचे तिच्या खेळावरूनच नव्हे तर तिच्या निकालावरूनही स्पष्ट दिसत होते. एकदा संयुक्त आघाडी घेतल्यावर तिच्या बरोबरच्या आघाडीवीर बदलत होत्या, पण वैशाली मात्र अढळ होती.

वैशालीच्या या विजयाचे श्रेय अर्थात सायप्रसमध्ये स्पर्धेदरम्यान तिला मदत करणारा १९ वर्षीय ग्रँडमास्टर प्रणेश आणि तिचे मुख्य प्रशिक्षक द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्या रमेशला जाते. मात्र, तिला रसम-भात खाऊ घालणाऱ्या तिच्या आई नागलक्ष्मी यांनाही आपल्याला विसरता येणार नाही. ‘सैन्य पोटावर चालतात’ अशी एक म्हण आहे आणि भारतीय बुद्धिबळ खेळाडूंसाठी ती तंतोतंत लागू पडते हे मी माझ्या अनुभवावरून सांगू शकतो.

# हार्दिक भरमैदानात बुमराहवर ओरडला! पंड्याच्या वागण्यावर चाहते संतापले

**मुंबई/वृत्तसंस्था**

हार्दिक पंड्याच्या नेतृत्त्वाखालील मुंबई इंडियन्सला यंदाच्या स्पर्धेतील सलग चौथ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. पंजाब किंग्सविरूद्ध वानखेडेच्या मैदानावर झालेल्या सामन्यातही मुंबईला ७ विकेट्सने पराभव पत्करावा लागला. पंजाबविरुद्धच्या या सामन्यात मुंबईची गोलंदाजी साधारणच होती. प्रथम फलंदाजी करताना क्विंटन डी कॉकच्या शतकाच्या जोरावर संघाने २० षटकांत पाच गडी गमावून १९५ धावा केल्या, परंतु मुंबईला या लक्ष्याचा बचाव करता आला नाही. यादरम्यान हार्दिक व बुमराहमध्ये मैदानावर वाद झाल्याचं दिसून आलं, ज्याचे फोटो सध्या व्हायरल होत आहेत.

मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या गोलंदाजीदरम्यान संघातील खेळाडूंवर खूप संतापलेला दिसला. क्षेत्ररक्षण सेट करत असताना जसप्रीत बुमराहवर नाराज असलेल्या हार्दिक पंड्याचे फोटो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. या शाब्दिक चकमकीदरम्यान बुमराहची प्रतिक्रिया हार्दिक पंड्याच्या वृत्तीवर नाराज असल्याचे दिसत होते.

हार्दिकला फिल्ड सेट करण्यासाठी बुमराह सजेशन देताना दिसला, पण बुमराहचं न ऐकता हार्दिक त्याचीच फिल्ड सेट करत वैतागताना दिसला आणि शेवटी हतबल होऊन बुमराहने हात झटकत हार्दिकने सांगितल्याप्रमाणे ऐकलं. बुमराहच्या चेहऱ्यावरील हावभाव पाहून चाहते प्रचंड संतापले आहेत. बुमराहसारख्या गोलंदाजाला हार्दिक अशी वागणूक देऊच कशी शकतो, असा प्रश्न चाहते उपस्थित करत आहेत. आयपीएल २०२६ ची सुरूवात अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहसाठी चांगली झालेली नाही. या हंगामात सर्व फलंदाज त्याच्याविरुद्ध सावधपणे खेळत आहेत आणि आपली विकेट गमावणं टाळत आहेत. यामुळेच आयपीएल २०२६ मध्ये बुमराहला सलग पाच सामन्यांमध्ये एकही विकेट मिळवता आलेली नाही. बुमराहला विकेट्स न मिळणं हे मुंबई इंडियन्सच्या खराब कामगिरीचं अजून एक महत्त्वाचं कारण आहे, कारण त्यामुळे इतर गोलंदाजांवरील दबाव वाढला आहे.


# कॅच ऑफ द सीझन! श्रेयस अय्यरचा कॅच बघून डोळ्यांवर विश्वास नाही बसणार; सूर्या-रोहितला आश्चर्याचा धक्का

**मुंबई/वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्स सामन्यात श्रेयस अय्यरच्या उत्कृष्ट झेलने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. श्रेयस अय्यरने बाऊंड्री लाईनजवळ क्षेत्ररक्षण करताना हवेत उंच उडी घेत एका हाताने टिपलेल्या कॅचने सर्वच जण अवाक् झाले आहेत. डगआऊटमध्ये बसलेले रोहित शर्मा व सूर्यकुमार यादव यांचे चेहरेदेखील आश्चर्याचा धक्का बसल्याने पाहण्यासारखे झाले होते. ज्याचा व्हीडिओ आता व्हायरल होत आहे.

पंजाब किंग्सने मुंबई इंडियन्सविरूद्ध सामन्याची नाणेफेक जिंकत मुंबईला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. रोहित शर्माच्या रूपात मुंबईला मोठा धक्का बसला असून रोहित या सामन्यात खेळताना दिसणार नाही. मुंबईची सुरूवात पुन्हा एकदा खराब झाली. दुसऱ्याच षटकात सलग दोन चेंडूंत रायन रिकल्टन व सूर्यकुमार यादव यांनी विकेट्स गमावल्या. यानंतर नमन धीर व क्विंटन डीकॉक यांनी शतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला होता.

नमन धीर अर्धशतकी खेळी करत बाद झाल्यानंतर हार्दिक पंड्या फलंदाजीला आला. हार्दिक पंड्याने १४ धावांच्या खेळीदरम्यान फक्त १ षटकार लगावला. मार्को यान्सनच्या १८व्या षटकातील पहिल्या चेंडूवर हार्दिकने



षटकार खेचला. हार्दिक १८व्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर अजून एक मोठा फटका खेळायला गेला. चेंडू पाहताच अय्यर त्याच्या डावीकडून लॉन्ग ऑनच्या दिशेने धावत गेला आणि षटकारासाठी जाणारा चेंडू हवेत उंच उडी मारून टिपला. श्रेयसचं शरीर बाऊंड्री लाईनच्या वर हवेत बाहेर होतं. श्रेयस बाऊंड्री लाईनबाहेर पडणार हे स्पष्ट दिसत होतं, तितक्यात त्याने बाहेर उभ्या असलेल्या झेवियर बार्टलेटच्या दिशेने चेंडू फेकला आणि त्याने तो टिपला. श्रेयस अय्यरने अगदी सुपरमॅनप्रमाणे हवेत ज्याप्रकारे झेप घेतली हे पाहून मुंबई इंडियन्सच्या डगआऊटमधील सर्वच जण चकित झाले. पण रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांना तर श्रेयस अय्यरचा झेल पाहून जणू आश्चर्याचा धक्का बसला. रोहित शर्मा तर तोंडावर हात ठेवून आश्चर्य व्यक्त करताना दिसला. रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादवच्या या प्रतिक्रियेचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.


# राकेश बापटबरोबरच्या नात्याबद्दल रेवा कौरसेचे वक्तव्य; म्हणाली, "त्याच्याबरोबर खूप..."

जानेवारी २०२६ मध्ये बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाची सुरुवात झाली होती. या पर्वात एकूण १७ स्पर्धक सहभागी झाले होते. राधा पाटील, सोनाली राऊत, रुचिता जामदार, दिपाली सय्यद, सागर कारंडे, सचिन कुमावत, तन्वी कोलते, आयुष संजीव, करण सोनावणे, प्रभु शेळके, प्राजक्ता शुक्रे, अनुश्री माने,राकेश बापट, रोशन भजनकर, दिव्या शिंदे, ओमकार राऊत, विशाल कोटियन हे स्पर्धक सुरुवातीला सहभागी झाले. त्यानंतर राखी सावंतची वाईल्ड कार्ड एन्ट्री झाली.

राखीनंतर आणखी तीन स्पर्धक वाईल्ड कार्ड म्हणून आले. यामध्ये रेवा कौरसे, संकेत पाठक आणि संस्कृती सांळुखे या तीन जणांचा समावेश होता. सध्या बिग बॉसचे हे पर्व अंतिम टप्प्यात आहे.

टॉप ५ स्पर्धकांनी अंतिम टप्प्यात प्रवेश केला आहे. राकेश बापट, अनुश्री माने, तन्वी कोलते, दिपाली सय्यद, विशाल कोटियन हे पाच स्पर्धक ट्रॉफी जिंकण्यापासून एक पाऊल दूर आहेत. या पाचपैकी कोणता सदस्य ट्रॉफी जिंकणार हे पाहणे महत्वाचे आहे. आता नुकतीच रेवा कौरसे घराबाहेर पडली. ती घरात असताना राखीने रेवा व राकेश यांच्या नात्याबद्दल वक्तव्य केले होते. तसेच, त्यांच्यातील मैत्री पाहून राखीने अनेकदा राग व्यक्त केला होता.

रेवा व राकेश यांच्यातील जवळीक राखीला आवडली नाही, त्यामुळे तिने रेवाविरुद्ध अनेक गोष्टी केल्या होत्या. आता घराबाहेर पडल्यानंतर रेवाने राकेश बापटबरोबर कसे नाते होते, त्याच्याबरोबर कसे बॉण्डिंग होते, यावर वक्तव्य केले आहे.



रेवाने नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत राकेशबरोबर असणाऱ्या नात्याबद्दल ती म्हणाली, "माझी आणि राकेशची चांगली मैत्री होती. त्याव्यतिरिक्त काहीच नव्हते. बाकीचे राखीच्या मनाचे खेळ होते. तिला असं वाटत होतं की, कदाचित माझ्या आणि राकेशमध्ये नातं निर्माण होईल. तसं, काही होऊ नये म्हणून तिने भांडण करण्यास सुरुवात केली होती. पण, राकेश व माझ्यात तसं काहीच नव्हतं. तसं असतं तर स्क्रीनवर दिसलं असतं. त्याच्याबरोबर खूप चांगली बॉण्डिंग होती. तो एक चांगला माणूस आहे. तो सुद्धा मला असं म्हणायचा की खरंच तू खूप चांगली आहे. तू हुशार आहेस, तू संवेदनशील आहेस.तो मला नन्हीं परी असंही म्हणायचा. तशी एक आमच्यात बॉण्डिंग होती. कारण- आम्ही एकाच ग्रुपमध्ये होतो.खेळाबद्दलही आमच्यात चर्चा व्हायच्या.त्याव्यतिरिक्त आमच्यात काहीच नव्हतं. आम्ही त्याला चिडवायचो." राखीने बिग बॉसच्या घरात आणि त्यानंतर अनेक मुलाखतीमध्ये राकेश बापटवर तिचे एकतर्फी प्रेम असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, आता राकेश, तन्वी , अनुश्री, विशाल, आणि दिपाली यापैकी कोणता स्पर्धक ट्रॉफी जिंकणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## "हिंदू कलाकारांचे चित्रपट बघा, कशाला हवेत खान?

मांसखरेदी हिंदू विक्रेत्यांकडूनच करायला हवी, अशी मागणी जोरकसपणे मांडणारे राज्याचे मत्स्य व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आता बॉलिवुड चित्रपटांबाबतही मोठं भाष्य केलं आहे. नाशिकमध्ये गुरुवारी रात्री झालेल्या जाहीर सभेमध्ये बोलताना नितेश राणेंनी शाहरूख खान, आमिर खान यांचे चित्रपट पाहू नका, असं थेट आवाहन उपस्थितांना केलं. त्यांच्या या विधानांची सध्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा पाहायला मिळत आहे. धुरंदर आणि छावा हे चित्रपट चांगले चालल्यामुळे बॉलिवुडमधल्या खान लोकांचे वांदे झाल्याचा दावा नितेश राणेंनी यावेळी केला. "आज खान लोकांचे खाण्याचे वांदे झाले आहेत. कारण आमचा धुरंदर आणि छावा त्यांना भारी पडतोय. ही ताकद हिंदू समाजाची आहे. आपणही निर्धार करायला हवा की आपण चित्रपट बघणार तर हिंदू कलाकारांचेच आणि इतर लोकांना घरी बसवणार. यांच्यामुळेच ही लव्ह जिहादसारखी प्रकरणं घडतात. रणवीर सिंग, हृतिक रोशन यांचे चित्रपट आहेत ना बघण्यासारखे. त्या कलाकारांचे चित्रपट बघा. कशाला पाहिजेत ती शाहरूख खान, आमिर खानची नाटकं? त्यांची घरं भरण्यासाठी?" असं मंत्री नितेश राणे यावेळी भाषणात म्हणाले.

# "चुकीच्या गोष्टी सहन करण्यापेक्षा बाहेर पडलेलं बरं...", घटस्फोटानंतर हंसिका मोटवानीचं वक्तव्य

हंसिका मोटवानी गेल्या काही दिवसांपूर्वी तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली होती. अभिनेत्रीने लग्नाच्या ३ वर्षांनंतर घटस्फोट घेतला. तिने उद्योजक सोहेल खातुरियासह लग्न केलं होतं. अशातच आता अभिनेत्रीने लग्न, प्रेम आणि हृदयभंग याबद्दल तिचं मत मांडलं आहे.

हंसिकाने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिला प्रेमामुळे कधी त्रास झालाय का, लग्न आणि पुन्हा प्रेमात पडण्याबद्दलची तिची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. हंसिकाने 'हॉटरफ्लाय'शी संवाद साधताना याबद्दल सांगितलं आहे. यावेळी मनमोकळेपणाने तिने संवाद साधला आणि घटस्फोटानंतरच्या कठीण काळात तिच्या कुटुंबीयांची तिला खूप साथ मिळाली असंही म्हटलं आहे. हंसिका याबद्दल नेमकं काय म्हणाली सविस्तर जाणून घेऊयात...

हंसिकाला मुलाखतीत जेव्हा तू डेट करायला सुरू केलं तेव्हा कधी हृदयभंग झाला का? असं विचारल्यानंतर ती म्हणाली, "हृदयभंग खूप त्रासदायक असतो. पण, आता आपल्याकडे असे अनेक पर्याय आहेत ज्यामुळे आपण यामधून बाहेर येऊ शकतो." हंसिकाला पुढे लग्न महिलांसाठी इतकं महत्त्वाचं का मानलं जातं आणि ठरावीक वयातच करण्यासाठी बोललं जातं असं विचारल्यानंतर ती म्हणाली, "मला माहीत नाही. माझ्याबरोबर तरी झालेलं नाहीये. मला कधीच तुझं वय झालं आहे लग्न केलं पाहिजे असं बोललं गेलं नाही." हंसिका पुढे म्हणाली, "बाहेर असे खूप लोक असतात जे तुम्ही काय केलं पाहिजे याबद्दल सांगत असतात. पण, आताच्या मुली खूप खंबीर आणि स्वतंत्र आहेत त्यामुळे त्या तेच करतात जे त्यांच्यासाठी चांगलं आहे. मी तरी कोणाचं ऐकलं नाहीये. आधी २५वर्षांत लग्न करा, मग ३० व्या वर्षी लग्न करा बोललं गेलं आणि आता ४०व्या वर्षी लग्न करा असं म्हटलं जातं. पण लग्नच नाही तर कुठलीही गोष्ट तेव्हाच केली पाहिजे जेव्हा तुम्हाला वाटत असेल."

कुटुंबाच्या पाठिंब्याबद्दल हंसिका पुढे म्हणाली, "माझ्या कुटुंबीयांनी मला कधीच कुठल्याच गोष्टीसाठी जबरदस्ती केली नाही." पुढे तिला आपल्या आयुष्यात जेव्हा कुठली महत्त्वाची गोष्ट घडते पण नंतर जेव्हा ती संपुष्टात येते तेव्हा खूप काही बोलंल जातं असं तुझ्याबाबतीत कधी झालंय का असं विचारल्यानंतर ती म्हणाली, "त्यांना क्लिकबीट हवे होते त्यांना ते मिळालं. त्यांना हेडलाईन हव्या होत्या त्यांना त्या मिळाल्या. मी कधीच स्पष्टीकरण दिलं नाही आणि कधी देणारही नाही कारण मला त्यामुळे काहीच फरक पडत नाही. मला अजिबात पश्चाताप नाहीये. चुकीच्या गोष्टी सहन करण्यापेक्षा त्यामधून बाहेर पडलेलं बरं. मला माझ्या कुटुंबाचा खूप पाठिंबा आहे आणि मला याचा जराही पश्चाताप नाहीये. जे आहे ते छान आहे. मी आनंदी आहे."



# "मी स्वेच्छेने इस्लाम स्वीकारला होता, माझा इस्लामवर विश्वास आहे"



बडे अच्छे लगते हैं' फेम लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री चाहत खन्ना हिने अलीकडेच तिच्या आयुष्यातील एका वादग्रस्त विषयावर भाष्य केले आहे. लग्नासाठी धर्मांतर केल्यानंतर पुन्हा सनातन धर्मात परतलेल्या चाहतने, धर्मांतराच्या निर्णयामागील सत्य सांगितले. चाहत खन्ना हिने दुसऱ्या लग्नापूर्वी धर्मांतर केलं होतं. आता तिने धर्मांतर आणि त्याभोवती असलेल्या गैरसमजांबद्दल तिचं मत मांडलं आहे. इस्लाम स्वीकारणं हा तिचा वैयक्तिक निर्णय होता, असं तिने म्हटलंय. चाहतने फरहान मिर्झाशी लग्न करण्यापूर्वी इस्लाम धर्म स्वीकारला होता.

शुभोजित घोष यांच्याशी बोलताना चाहतने स्पष्ट केलं की तिच्या बोलण्याचा अनेकदा चुकीचा अर्थ लावला जातो, ज्यामुळे दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरतात. "माझ्या वक्तव्यांचा नेहमीच चुकीचा अर्थ काढला जातो. आजही मी काही बोलले, तर त्यातील एखादं वाक्य उचललं जाईल आणि वेगळ्या संदर्भाने प्रसिद्ध केलं जाईल."

फरहान मिर्झाशी लग्न केलं, तेव्हा धर्मांतराचा निर्णय पूर्णपणे आपला असल्याचं चाहत खन्नाने सांगितलं. "मी एक अतिशय धर्मनिरपेक्ष व्यक्ती आहे. माझं लग्न झालं असो वा नसो, मी दिवाळी जितक्या उत्साहात साजरी करते, तितक्याच उत्साहात ईदही साजरी करते. हो, मी माझ्या स्वेच्छेने इस्लाम स्वीकारला होता. अनेकजण म्हणतात की माझ्यावर धर्मांतरासाठी दबाव आणला गेला होता, पण मी असं कधीच म्हटलेलं नाही."

"हो, माझा इस्लामवर विश्वास आहे आणि माझा सनातन धर्मावरही तितकाच विश्वास आहे. याचा अर्थ असा नाही की माझा इतर धर्मांवर विश्वास नाही. मी एक अतिशय धर्मनिरपेक्ष व्यक्ती आहे," असं चाहत खन्ना म्हणाली. स्क्रीनने हे वृत्त दिलंय.

आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि घटस्फोटांविषयी होणाऱ्या नकारात्मक बातम्यांमुळे मानसिक धक्का बसला, असं चाहतने सांगितलं. "मला खूप निराश आणि दु:खी वाटायचं, भीती वाटायची. मला वाटायचं की हे माझ्याबरोबर काय घडतंय? माझं नाव खराब होत आहे. काही लोकांनी तर मला असंही म्हटलं होतं की या सगळ्या गोष्टींमुळे मला काम मिळणार नाही." मात्र, काळानुसार त्यांचा दृष्टिकोन बदलला.

"जशा गोष्टी घडत गेल्या, तसे माझे लोकांबाबतचे, आयुष्याबाबतचे आणि विविध गोष्टींबद्दलचे ज्ञान वाढत गेले. त्या ज्ञानामुळे माझा आत्मविश्वासही वाढला आणि मग या गोष्टी मला खूप क्षुल्लक वाटू लागल्या," असं चाहत खन्ना म्हणाली.

**चाहत खन्ना यापूर्वी काय म्हणाली होती?**

२०२४ मध्ये 'टेली टॉक इंडिया'ला दिलेल्या एका मुलाखतीत चाहत खन्नाने धर्मांतर केल्याबद्दल कोणताही पश्चाताप नसल्याचं म्हटलं होतं. आता ती पुन्हा सनातन धर्मात परतली असली, तरी इस्लाममधून तिला जे काही शिकायला मिळालं त्याचा आदर करत असल्याचं ती म्हणाली होती. "घटस्फोटानंतर मला माझ्या मूळ धर्मात परत येण्यासाठी बराच वेळ लागला. इस्लामवर विश्वास ठेवण्यासाठी मला ४-५ वर्षे लागली आणि अजूनही त्यांच्या काही मूळ तत्वांवर माझा विश्वास आहे. ती तत्वे खूप चांगली आहेत. पण सुदैवाने, जेव्हा मी पुन्हा माझ्या सनातन धर्माच्या मुळांकडे परतले, तेव्हा मला अनेक गोष्टींमागचे सत्य उमगले," असं चाहत खन्ना म्हणाली.

तुझे 'ब्रेनवॉश' करण्यात आले होते का? असं विचारल्यावर चाहत म्हणाली, "मी खात्रीशीरपणे सांगू शकत नाही, पण त्याकडे त्या नजरेतून पाहिलं जाऊ शकतं. ते नक्की काय होतं हे मला माहीत नाही, पण 'हो' ब्रेनवॉश झाले होते असं म्हणता येईल. म्हणूनच मी म्हणते की सुदैवाने मी पुन्हा माझ्या मूळ धर्मात परतलेय. मी धर्मांतर करावे अशी अनेकांची इच्छा नव्हती, पण मला निकाह करायचा होता म्हणून मी ते केलं. माझ्यावर धर्मांतरासाठी सक्ती करण्यात आली नव्हती, मी स्वतःहून ते केलं होतं. पण त्यानंतर मला नक्कीच असं सांगण्यात आलं होतं की, 'तुझ्या देवांची पूजा करू नकोस, ते योग्य नाही' आणि एका भरकटलेल्या मुलाप्रमाणे मी त्या मार्गावर चालत गेले. मला वाटतं ते ठीक होतं, इतकंही वाईट नव्हतं. पण आता मी आनंदी आहे, खूप चांगल्या स्थितीत आहे, मी त्यातून शिकले, समजूतदार झाले आणि मी काय करतेय हे मला ठाऊक आहे. काय बरोबर आणि काय चूक हे मला समजतंय आणि मी आता अतिशय सजग आयुष्य जगत आहे," असं चाहत खन्ना म्हणाली.

# शिवछत्रपती क्रीडापीठाच्या क्रीडा प्रबोधिनींसाठी प्रवेश सुरू; २३ एप्रिलपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**बुलढाणा**

शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनींमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन खेळाडूंच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ही प्रवेश प्रक्रिया सरळ प्रवेश व कौशल्य चाचणीच्या माध्यमातून निवासी व अनिवासी खेळाडूंकरिता राबविण्यात येणार आहे. विभाग व राज्यस्तरीय कार्यक्रम तसेच विभागस्तरावर होणाऱ्या चाचण्यांसाठी खेळाडूंचा डेटा संकलित करण्यासाठी गुगल लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व इच्छुक खेळाडूंनी :/ /./२ या लिंकद्वारे नोंदणी करावी. नोंदणीची अंतिम तारीख २३ एप्रिल २०२६ पर्यंत आहे. यानंतर नोंदणीकृत खेळाडूंची यादी खेळ व चाचणीनिहाय संबंधित विभागीय उपसंचालकांकडे पाठविण्यात येईल. जे खेळाडू गुगल लिंकवर नोंदणी करणार नाहीत, त्यांच्या नावांची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी संबंधित विभागीय उपसंचालकांना त्वरित कळवावी. तसेच, चाचणीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंनाही चाचणीची संधी देण्यात येणार आहे. नोंदणीकृत सर्व खेळाडूंना चाचणीचे ठिकाण व दिनांक विभागीय उपसंचालकांकडून कळविण्यात येईल. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील खेळाडूंना ही माहिती पोहोचवावी. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी चाचण्या प्रथम विभागस्तरावर व त्यानंतर राज्यस्तरावर आयोजित करण्यात येतील.


# आंतरराष्ट्रीय खेळाडू भक्ती आंब्रे यांनी स्वीकारला जिल्हा क्रीडा अधिकारी पदाचा पदभार

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशान्वये दि. १५ एप्रिल २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय पावरलिफ्टींग खेळाडू तथा ड्रस्ट्रॉंग वुमन ऑफ इंडियाफ किताब प्राप्त, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी भक्ती अजित आंब्रे यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा या पदाचा कार्यभार स्वीकारला. आंब्रे या यापूर्वी तालुका क्रीडा अधिकारी, पालघर येथे कार्यरत होत्या. शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेत पदोन्नती देत त्यांची बुलढाणा येथे जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. पावरलिफ्टींग या खेळातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीमुळे त्यांना ड्रस्ट्रॉंग वुमन ऑफ इंडियाफ हा विशेष किताब तसेच शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. स्वतः एक यशस्वी खेळाडू असल्यामुळे जिल्ह्यातील पावरलिफ्टींगसह विविध क्रीडा प्रकारांना चालना देत खेळाडूंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्यासाठी त्या प्रयत्नशील राहतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भक्ती आंब्रे यांनी प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी बि. एस. महानकर यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# स्वतःहून बलात्कार करुन घेणाऱ्या महिलांवर पोलीस केसेस दाखल कराव्यात...

## माजी मंत्री सुबोध सावजी यांचे वादग्रस्त विधान ..



**जनसंचलन/बुलढाणा**


स्वतःहून बलात्कार करुन घेणाऱ्या महिलांवर पोलीस केसेस दाखल करुन यांची नावे, फोटो असल्यास व्हिडीओ चित्रीकरण शासनाने समाजासमोर आणावी, असे वादग्रस्त विधान करत माजीमंत्री सुबोध सावजी यांनी राज्यपाल यांना पत्र पाठविले आहे .. त्यामुळे एकच एकच खळबळ उडाली आहे.. सावजी यांनी राज्यपालांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, बलात्कार दोन प्रकारचे आहेत, एक जबरदस्ती केलेला बलात्कार दुसरा महिलेने स्वतःहून करवून घेतलेला बलात्कार.. जबरदस्ती केलेला बलात्कार यामध्ये महिलांची नावे गुपित राहिलीच पाहिजेत, हे समाजाकरीता चांगले आहे.. मात्र ज्या महिलांनी स्वार्थाकरीता, पैसे कमविण्याकरीता बलात्कार करवुन घेतले, अशा व्यभिचारी महिला समाजाला कलंक आहेत.. अशा महिलांना समाजासमोर आणने हे माझे तसेच राज्यातील जनतेचे स्पष्ट मत आहे.. अशा महिला जनतेसमोर उघड झाल्यास इतर महिला अशा वागणार नाहीत स्वार्थाकरीता, पैशाकरीता बलात्कार करवुन घेण्याचे प्रकार कमी होतील.. भोंदू बाबा, संत, महात्मे, महाठग, आर्थिक लाभाचे नादी लागून अनेक महिला निरनिराळ्या ठिकाणी जावुन बलात्कार करवुन घेतात, या बलात्कारीत महिलांची नावे जाहिर करावयाचे नाहीत अशा शासन निर्णय आहे.. मात्र व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येते.. त्यामुळे राज्यातील जनतेसह आपणास अशी विनंती आहे की, ज्या महिला स्वतःहून निरनिराळ्या प्रकारे बलात्कार करवुन घेतात यांची नावे, फोटो असल्यास व्हिडीओ चित्रीकरण हे सर्व शासनाने जाहिर करावे.. आपण या बाबत शासनास निर्देशीत करावे , असे ही राज्यपाल यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे .. आता माजी मंत्री सुबोध सावजी यांच्या या विधानाने कोणते वादळ उठते, याकडे लक्ष लागून आहे ..

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवारी




**जनसंचलन/बुलढाणा**

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने एप्रिल महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# माझं गाव,आरोग्य कार्यशाळ बुलढाणा शहरात संपन्न

## महिलांच्या आरोग्याच्या होणाऱ्या समस्यावर मा. डॉ. निपुण विनायक प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य सेवा मंत्रालय, मुंबई यांनी केले मार्गदर्शन...



**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरातील मलकापूर रोडवरील हॉटेल रेसिडेंन्सी येथे माझं गाव, आरोग्य कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न झाले आहे.जिल्हायातील डॉक्टर्स आणि नर्स आशासेविका मोठ्या संख्यानी या ठिकाणी उपसथितीत होते.गाव अभियानांतर्गत सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा विषयावर जिल्हास्तरीय प्रशिक्षण व कार्यशाळा मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान मा. डॉ. निपुण विनायक (प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य सेवा, मंत्रालय, मुंबई) यांनी भूषविले. यावेळी मा. विलासजी बेद्रे (उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई) प्रमुख उपस्थित होते. कार्यशाळेदरम्यान मा. डॉ. निपुण विनायक यांनी सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवांबाबत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधत उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी आरोग्य सेवा अधिक प्रभावी व सर्वसमावेशक करण्यासाठी आवश्यक बाबींवर विशेष भर दिला. यावेळी जिल्हा परिषद, बुलढाणा चे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. गुलाब खरात (भा.प्र.से.) यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या आरोग्य सेवांविषयी मनोगत व्यक्त केले. बुलढाणा जिल्हा दौऱ्यादरम्यान मा. डॉ. निपुण विनायक यांनी मलकापूर येथे आगमनानंतर पहाटे उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर येथे भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र शेलगाव आटोळ तसेच उपकेंद्र भरोसा येथे भेट देऊन उपकेंद्राच्या इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली. भरोसा येथील महिला सरपंच श्रीमती बालाबाई हटकर यांची भेट घेऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला व आरोग्य सेवांबाबत माहिती जाणून घेतली. दुपारी बुलढाणा येथील रेसिडेन्सी क्लब येथे जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस उपसंचालक डॉ. सुशील वाकचौरे (अकोला मंडळ), जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, सहाय्यक संचालक तरंग तुषारवारे (मॅडम), अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. हरि पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे (मॅडम), जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आयुष वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या. सदर कार्यशाळेचे सूत्रसंचालन वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलेश खंडारे यांनी केले.

# भेंडवळची ऐतिहासिक घटमांडणी १९ एप्रिलला...

## पावसाच्या अंदाजाकडे शेतकऱ्यांचे लक्ष..



**जनसंचलन/बुलढाणा**

अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर होणार घट मांडणी आहे तर२०एप्रिललावर्तविलेजाणारभाकीत.. पीकस्थिती, पावसाचे प्रमाण तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडींचा अंदाज वर्तविणारी भेंडवड ची पारंपरिक घटमांडणी यावर्षी १९ एप्रिल रोजी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर होणार आहे .. या मांडणीद्वारे पावसाचे भाकीत काय येणार, याकडे संपूर्ण शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.. विदर्भासह राज्यभर प्रसिद्ध असलेल्या या घटमांडणीतून अतिवृष्टी, दुष्काळ, पीकस्थिती, आर्थिक तसेच राजकीय परिस्थिती आणि विविध संकटांबाबत अंदाज वर्तविले जातात.. त्यामुळे या मांडणीबाबत शेतकरी वर्गासह राजकीय नेते, आणि विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना मोठी उत्सुकता असते

# मागासवर्गीय वीज कर्मचारी संघटनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**जनसंचलन/बुलढाणा**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मागासवर्गीय वीज कर्मचारी संघटना, विभाग खामगाव च्या वतीने अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महामानवाच्या विचारांना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी संघटनेचे पदाधिकारी आणि वीज कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी संघटनेचे विभागीय अध्यक्ष अमर गवारगुरू, उपाध्यक्ष विजय दांडगे, सचिव महादेव हळम, संगम वानखडे मंडळ अध्यक्ष, पृथ्वीराज वानखडे उपाध्यक्ष, गडपाले, सचिन दुबल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना संबोधित करताना वक्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. वीज क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी बाबासाहेबांचे शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हे ब्रीदवाक्य आणि वीज क्षेत्रात बाबासाहेब यांचे अमूल्य कार्य माहिती देऊन, संघटनेच्या माध्यमातून सामाजिक न्याय मिळवण्यासाठी तत्पर राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या वेळी संघटनेच्या वतीने बोथाकाजी येथे विभागीय अध्यक्ष अमर गवारगुरू यांच्या निवासस्थानी मिरवणुकी दरम्यान भीम सैनिकांना सरबत व थंड पेय जल वितरित करण्यात आले. या वेळी संघटनेच्या वतीने विनोद गवई, संतोष इंगळे, नाना मोरे, शेख. कडू, शेख सादिक, गोपाल सोळंके, सतीश निंबाळकर, राहुल हिवराळे, पवन हिवराळे, भीम शक्ति क्रीडा मंडळातील पदाधिकारी आणि सदस्य इतर संघटनेचे सभासद उपस्थितीत होते.

# पावसाळ्यापूर्वी फिडर सेपरेशन पूर्ण करा;- मुख्य अभियंता श्री. राजेश नाईक

**बुलढाणा**

अकोला परिमंडळात सुरू असलेल्या फिडर सेपरेशनच्या कामामुळे वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेत सुधारणा होवून वीज ग्राहकांना अखंडित व दर्जे दार वीजपुरवठा मिळणार असून या कामाला गती देण्याचे निर्दे श मुख्य अभियंता श्री. राजेश नाईक यांनी दिले आहेत. सध्या या प्रकल्पाचे सुमारे ६५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विद्युत भवन येथे पार पडलेल्या पायाभूत आराखडा विभागाच्या आढावा बैठकीत त्यांनी फिडरनिहाय कामाचा आढावा घेतला. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक सोनोने, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यामिनी पिंपळे, तसेच विभागातील क्षेत्रीय सहाय्यक अभियंते आणि कंत्राटदार एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते. कामाच्या गतीबाबत नाराजी व्यक्त करत मुख्य अभियंत्यांनी कंत्राटदारांना वेळेत काम पूर्ण करण्याच्या कडक सूचना दिल्या. तसेच दर आठवड्याला प्रगती आढावा बैठक घेण्याचे निर्देशही देण्यात आले. आरडीएसएस योजनेअंतर्गत अकोला परिमंडळात कृषी व गावठाण फिडरचे विलगीकरण करण्यात येत असून या कामासाठी एकूण २६५.८४ कोटी रुपयांचा खर्च होत आहे. या प्रकल्पात १७८ नवीन फिडर उभारले जात असून २५२९ किमी नवीन वीजवाहिन्या, ९६ किमी भूमिगत केबल, १६४ किमी लघुदाब वाहिन्या, ९५ एसडीटी आणि ७७१ नवीन वितरण रोहित्रांची उभारणी केली जात आहे. फिडर सेपरेशनमुळे फिडरची लांबी कमी होऊन वितरणातील वीज हानीत लक्षणीय घट होणार आहे. परिणामी शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज उपलब्ध होणार असून इतर ग्राहकांना २४ तास अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा देणे शक्य होणार आहे. परिमंडळातील १७८ फिडरपैकी अकोला जिल्ह्यात ९६ फिडर असून त्यापैकी ३७ कार्यान्वित झाले आहेत, २० पूर्ण झाले असून ३९ प्रगतीपथावर आहेत. बुलडाणा जिल्ह्यात ६३ फिडरपैकी ४३ कार्यान्वित, ६ पूर्ण व १४ प्रगतीपथावर आहेत. वाशिम जिल्ह्यातील १९ फिडरपैकी ५ कार्यान्वित, ४ पूर्ण व १० फिडरचे काम सुरू आहे. एकूणच, फिडर सेपरेशन प्रकल्पामुळे अकोला परिमंडळातील वीजपुरवठा अधिक सक्षम, स्थिर आणि गुणवत्तापूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८